महाराष्ट्र शासन

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर

छत्रपती शिवाजी स्टेडियम, खासबाग मैदान, कोल्हापूर

फोन नं :- (०२३१-२६४५२०८) ई-मेल :- dsokop@gmail.com

दिनांक- ५ डिसेंबर, २०२३

## नोटीस

जिल्हा क्रीडा परिषद, कोल्हापूर अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथे क्लर्क कम डाटा एन्ट्री ऑपरेटर हे पद मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पद्धतीने भरणेबाबत ...

जिल्हा क्रीडा परिषद, कोल्हापूर अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथे १५ डिसेंबर, २०२३ ते १४ नोव्हेंबर, २०२४ या कालावधीकरिता क्लर्क कम डेटा एन्ट्री ऑपरेटर पद संख्या २ हे पद तात्पुरत्या स्वरुपात (११ महिने कालावधीकरिता) कंत्राटी पद्धतीने स्वयंरोजगार सहकार संस्था यांच्यामार्फत भरावयाचे आहे. त्यासाठी दरपत्रक मागविण्यात येत आहेत. दरपत्रक सादर करण्यासाठी पुढीलप्रमाणे अटी-शर्ती असून कागदपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१. ज्या संस्था सहकारी खात्याकडे नोंदणीकृत आहेत, अशा संस्था अर्ज करु शकतात.
२. ज्या संस्था जिल्हा स्वयंरोजगार कार्यालयाकडे नोंदणीकृत आहेत, अशा संस्था अर्ज करु शकतात.
३. संस्थेस मनुष्यबळ पुरवठा केला असल्याचा अनुभव असणे अनिवार्य आहे.
४. संस्थेचे मागील तीन वर्षाचे लेखाविवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.
५. संस्थेचा जी. एस्. टी. क्रमांक व पॅन कार्ड क्रमांक असल्याचे स्वाक्षांकित प्रमाणपत्र प्रत सादर करणे अनिवार्य आहे.
६. कार्यालयासाठी आवश्यक असणारे कर्मचारी हे पात्रतेनुसार पुरवण्याचे हमीपत्र सादर करावे लागेल. (पात्रता संबंधित माहिती कार्यालयास द्यावी लागेल.)
७. उपलब्ध करुन देण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी कामकाज करण्यास असक्षम असल्याचे निदर्शनास आल्यास संस्थेचे आदेश रद्द करण्यात येतील.
८. दरपत्रक सादर करताना सर्व करांसह दर सादर करण्यात यावे.
९. दरपत्रक मंजूर झाल्यानंतर शासन निर्णयातील अटी-शर्तीनुसार रु. १००/- स्टॅम्प पेपरवर बंधपत्र सादर करणे अनिवार्य आहे.
१०. दरपत्रकाबाबतचा अंतीम निर्णय जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे राहतील.
११. दि. १२/१२/२०२३ पर्यंत दरपत्रक सादर करावे.
१२. दरपत्रक उघडणेपूर्वी सर्व कागदपत्र तपासले जातील. तद्नंतरच दरांबाबतचे कागदपत्र तपासले जातील.

5/12/2023

District Sport Officer Kolhapur

(नीलिमा अडसूळ)
जिल्हा क्रीडा अधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा क्रीडा परिषद, कोल्हापूर